# राष्ट्रीय प्रजनन आरोग्य संशोधन संस्था परळ, मुंबई

**(भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद) व**

# बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

**यांचा संयुक्त उपक्रम**

***" लैंगिक संबंधातून पसरणारे संसर्ग व गर्भाशयमुखाचा कर्करोग याविषयी मुंबई शहरातील झोपडपट्ट्यांमधील जोडप्यांचे ज्ञान वाढविण्याच्या व आरोग्य सेवा प्राप्त करण्यासंबंधीत वर्तनाचा विकास करण्याच्या दृष्टिने करण्यात येणारा अभ्यास "***

## प्रजनन मार्ग लैंगिक संबंधातून पसरणारे आजार
## (आर.टी.आय् / एस.टी.आय्)

***प्रजनन मार्ग व लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या आजारांविषयी पुरुषांकरिता संदेश***

१. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजार या विषयी योग्य माहीती मिळविण्याकरिता जवळच्या आरोग्य केंद्रास भेट द्या किंवा डॉक्टरांशी संपर्क साधा.

२. जर आपणांस किंवा आपल्या पत्नीला लैंगिक आजार झालेला असेल तर आपली व आपल्या पत्नीची तपासणी करून उपचार करून घ्या. जेणेकरून पुर्न:संसर्ग टाळता येईल.

३. लैंगिक आजाराचा संसर्ग टाळण्याकरिता निरोधचा वापर करा. शंका असल्यास समुपदेशकाला भेटा व चर्चा करा.

४. लैंगिक आजार झालेल्या व्यक्तींना एच.आय.व्ही. ची बाधा होण्याचा जास्त संभव असतो.

५. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजाराविषयी चर्चा करण्यास लाजू नका किंवा भिती बाळगू नका.

***प्रजनन मार्गाचे आजार म्हणजे काय?***

प्रजनन मार्गाचे आजार हे एक प्रकारचे लैंगिक आजारच आहेत. या आजारामध्ये गर्भाशिय, गर्भनलिका, योनीचे बाहयांग, योनी, गर्भाशयाचे तोंड, अंडाशय हे स्त्रीयांमधील अवयव बाधीत होत असतात. ओटीपोटावरील सुज अर्थात पेल्व्हीक इनप्लामेटरी डिसीज, (PID) म्हणजेच बिजांडकोष, बीजवाहक नलिका, गर्भाशय मुख आणि गर्भाशय या सारख्या प्रजनन संस्थेच्या विभिन्न अवयवांना झालेला जंतुसंसर्ग हा सुध्दा एक प्रजनन मार्गाचा आजार आहे. ज्यामुळे वंध्यत्व येऊ शकते किंवा जन्माला येणाऱ्या बाळास त्याचा संसर्ग होऊ शकतो.

***प्रजनन मार्गातील आजाराचे मुख्यत्वे तीन प्रकार आहेत.***

| | |
|---|---|
| अ. बाह्यांगावर दिसणारे आजार | - प्रजनन अवयवांवर आढळून येणारी वाढ |
| ब. आंतरीक आजार | - वैद्यकिय प्रक्रियेमुळे होणारे आजार |
| क. लैंगिक संबंधातून पसरणारे आजार | - संभोगाद्वारे पसरणारे आजार |

***लैंगिक संबंधातून पसरणारे आजार म्हणजे काय?***

व्यक्ती-व्यक्ती मधील लैंगिक संबंधाद्वारे होणाऱ्या जंतुसंसर्गामुळे जे संसर्गिक आजार होतात त्यांना लैंगिक आजार म्हणतात. हा आजार अतिसुक्ष्म जंतुमुळे होतो. या जंतुना विषाणु किंवा जीवाणु म्हणतात. वेगवेगळ्या जीवाणु किंवा विषाणुंमुळे वेगवेगळ्या प्रकारचे लैंगिक आजार होतात. एकापेक्षा जास्त व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला तसेच लैंगिक आजार असलेल्या बाधित व्यक्तीबरोबर संबंध ठेवणाऱ्या निरोगी व्यक्तीला या रोगाचा संसर्ग होण्याचा जास्त धोका